श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

## श्रीमद्भगवद्गीता पञ्चदशो अध्याय मराठी



पार्थ सारथी ने समझाया धर्म -कर्म का ज्ञान,
मानव जीवन सफल बना ले गीता अमृत मान।

**नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।**
**देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्**

अन्तर्यामी नारायण स्वरूप भगवान् श्रीकृष्ण, (उनके नित्य सखा) नरस्वरूप नरश्रेष्ठ अर्जुन, (उनकी लीला प्रकट करनेवाली) भगवती सरस्वती और (उन लीलाओं का संकलन करनेवाले) महर्षि वेदव्यास को नमस्कार करके जय के साधन वेद-पुराणों का पाठ करना चाहिये।

**नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।**
**प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्**

जिन भगवान के नामों का संकीर्तन सारे पापों को सर्वथा नष्ट कर देता है और जिन भगवान के चरणों में आत्मसमर्पण, उनके चरणों में प्रणति सर्वदा के लिए सब प्रकार के दुःखों को शांत कर देती है, उन्हीं परम -तत्वस्वरूप श्रीहरि को मैं नमस्कार करता हूं।

**श्रीमद्भगवद्गीतायां(म्)**
**पञ्चदशोध्याय:**

**श्रीभगवानुवाच**

**ऊर्ध्वमूलमधः(श्) शाख- मश्वत्थं(म्) प्राहुरव्ययम्।**
**छन्दां(म्)सि यस्य पर्णानि, यस्तं(वँ) वेद स वेदवित् ॥ 1 ॥**

श्री भगवान म्हणाले ,आ दि पुरुष परमेश्वर रुपी मूळ असलेल्या ब्रह्मदेव रूप मुख्य फांदी असलेल्या ज्या संसाररूप अश्वत्थ वृक्षाला अविनाशी म्हणतात ,तसेच वेद ही ज्याची पाने म्हटली आहेत ,त्या संसार रूप वृक्षाला जो पुरुष मुळासहित तत्वतः जाणतो ,तो वेदांचे तात्पर्य जाणणारा आहे .

**अधश्चोर्ध्वं(म्) प्रसृतास्तस्य शाखा,**
**गुणप्रवृद्धा विषयप्रवालाः ।**

**अधश्च मूलान्यनुसन्ततानि,**

**कर्मानुबन्धीनि मनुष्यलोके ॥ 2 ॥**

त्या संसार वृक्षाच्या तिन्ही गुण रूप पाण्याने वाढलेल्या ,तसेच विषय भोगरूप अंकुरांच्या,देव,मनुष्य आणि पशु-पक्ष्यादीयोनी रूप फांद्या खाली व वर सर्वत्र पसरल्या आहेत.तसेच मनुष्य योनीत कर्मानुसार बांधणारी अहंता-ममता आणि वासना रूप मुळे ही खाली आणि वर सर्व लोकांत व्यापून राहिली आहेत.

**न रूपमस्येह तथोपलभ्यते,**

**नान्तो न चादिर्न च सम्प्रतिष्ठा ।**

**अश्वत्थमेनं(म्) सुविरूढमूल-**

**मसङ्गशस्त्रेण दृढेन छित्त्वा ॥ 3 ॥**

या संसार वृक्षाचे स्वरूप जसे सांगितले आहे ,तसे येथे विचारकाली आढळत नाही.कारण याचा ' आदी 'नाही.'अंत'नाही .तसेच त्याची उत्तम प्रकारे स्थिरता ही नाही म्हणून या अहंता ,ममता आणि वासना रुपी अतिशय घट्ट मुळे असलेल्या संसाररूपी अश्वत्थ वृक्षाला बळकट वैराग्यरूप शस्त्राने मुळांसह कापणे होय .

**ततः(फ्) पदं(न्) तत्परिमार्गितव्यं(यँ),**

**यस्मिन्गता न निवर्तन्ति भूयः ।**

**तमेव चाद्यं(म्) पुरुषं(म्) प्रपद्ये,**

**यतः(फ्) प्रवृत्तिः(फ्) प्रसृता पुराणी ॥ 4 ॥**

त्यानंतर त्या परमपदरूप परमेश्वराला चांगल्या प्रकारे शोधले पाहिजे .जेथे गेलेले पुरुष संसारात परत येत नाहीत आणि ज्या परमेश्वरापासून या प्राचीन संसार वृक्षाची प्रवृत्ती परंपरा विस्तार पाऊली आहे, त्या आदिपुरुषनारायणाला मी शरण आहे ,अशा आदृढनिश्चय आणि त्या परमेश्वराचे मनन आणि नि दि ध्यासन केले पाहिजे .

**निर्मानमोहा जितसङ्गदोषा,**

**अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः ।**

**द्वन्द्वैर्विमुक्ताः(स्) सुखदुःखसञ्ज्ञैर्-**

**गच्छन्त्यमूढाः(फ्) पदमव्ययं(न्) तत् ॥ 5 ॥**

ज्यांचे मान व मोहन नष्ट झाले ,त्या ज्यांनी आसक्ति रूप दोष जिंकला,ज्यांची परमात्म्याच्या स्वरूपात नित्य स्थिती असते आणि ज्यांच्या कामना पूर्णपणे नाहीसा झाल्या'ते सुखदुःख नावाच्या द्वंद्वापासून मुक्त झालेले ज्ञानिजन त्या अविनाशी परमपदाला पोहोचतात .

न तद्भासयते सूर्यो, न शशाङ्को न पावकः ।

यद्गत्वा न निवर्तन्ते, तद्धाम परमं(म्) मम ॥ 6 ॥

ज्या परमपदाला पोचल्यावर माणसे फिरून या संसारात येत नाहीत ,त्या स्वयंप्रकाशी परमपदाला ना सूर्य प्रकाशित करू शकतो ,ना चंद्र ,ना अग्नी 'तेच माझे परमधाम आहे .

ममैवां(म्)शो जीवलोके, जीवभूतः(स्) सनातनः ।

मनः(ष्) षष्ठानीन्द्रियाणि, प्रकृतिस्थानि कर्षति ॥ 7 ॥

या देहात हा सनातन जिवात्मा माझाच अंश आहे आणि तोच प्रकृतीत स्थित मनाला आणि पाचही इंद्रियांना आकर्षित करतो .

शरीरं(यँ) यदवाप्नोति, यच्चाप्युत्क्रामतीश्वरः ।

गृहीत्वैतानि सं(यँ)याति, वायुर्गन्धानिवाशयात् ॥ 8 ॥

वारा वासाच्या वस्तूतून वास घेऊन स्वतःबरोबर नेतो.तसाच देहा दिकांचा स्वामी जीवात्मा ही ज्या शरीराचात्याग करतो,त्या शरीरातून मनसहीत इंद्रिये बरोबर घेऊन नवीन मिळणाऱ्या शरीरात जातो .

श्रोत्रं(ञ्) चक्षुः(स्) स्पर्शनं(ञ्) च, रसनं(ङ्) घ्राणमेव च।

अधिष्ठाय मनश्चायं(वँ), विषयानुपसेवते ॥ 9 ॥

हा जीवात्मा कान,डोळे,त्वचा,जीभ नाक आणि मन यांच्या आश्रयानेच विषयांचा उपभोग घेतो.

उत्क्रामन्तं(म्) स्थितं(वँ) वापि, भुञ्जानं(वँ) वा गुणान्वितम्।

विमूढा नानुपश्यन्ति, पश्यन्ति ज्ञानचक्षुषः ॥ 10 ॥

शरीर सोडून जात असता किंवा शरीरात रा हात असता किंवा विषयांचा भोग घेत असता किंवा तीन गुणांनी युक्त असता ही(त्याआत्मस्वरूपाला)अज्ञानी लोक ओळखत नाहीत.केवळ ज्ञानरूपदृष्टी असलेले विवेकी ज्ञानीच तत्वतः ओळखतात .

यतन्तो योगिनश्चैनं(म्), पश्यन्त्यात्मन्यवस्थितम् ।

यतन्तोऽप्यकृतात्मानो, नैनं(म्) पश्यन्त्यचेतसः ॥ 11 ॥

योगीज नही आपल्या हृदयात असलेल्या या आत्म्याला प्रयत्नानेच तत्वतः जाणतात ;परंतु ज्यांनी आपले अंतःकरण शुद्ध केले नाही असे अज्ञानी लोक प्रयत्न करूनही या आत्मस्वरूपाला जाणत नाहीत .

यदादित्यगतं(न्) तेजो, जगद्भासयतेऽखिलम् ।

यच्चन्द्रमसि यच्चाग्नौ, तत्तेजो विद्धि मामकम् ॥ 12 ॥

सूर्यामध्ये राहून जे तेज सर्व जगाला प्रकाशित करते,जे तेज चंद्रात आहे आणि जे अग्नीत आहे,ते माझेच तेज आहे,असे तू जाण .

गामाविश्य च भूतानि, धारयाम्यहमोजसा ।

पुष्णामि चौषधीः(स्) सर्वाः(स्), सोमो भूत्वा रसात्मकः ॥ 13 ॥

आणि मीच पृथ्वीत शिरून आपल्या शक्तीने सर्व भूतांना धारण करतो आणि रस रूप अर्थात अमृतमय चंद्र होऊन सर्व वनस्पतींचे पोषण करतो .

अहं(व्ँ) वैश्वानरो भूत्वा, प्राणिनां(न्) देहमाश्रितः ।

प्राणापानसमायुक्तः(फ्), पचाम्यन्नं(ञ्) चतुर्विधम् ॥ 14 ॥

मीच सर्व प्राण्यांच्या शरीरात राहणारा,प्राण व अपनाने संयुक्त विश्वास अग्नीरूप होऊन चार प्रकारचे अन्नपचवितो .

सर्वस्य चाहं(म्) हृदि सन्निविष्टो-

मत्तः(स्) स्मृतिर्ज्ञानमपोहनं(ञ्) च ।

वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो,

वेदान्तकृद्वेदविदेव चाहम्॥ 15 ॥

मीच सर्व प्राण्यांच्या हृदयात अंतर्यामी होऊन राहिलो आहे.माझ्यापासूनच स्मृती,ज्ञान आणि अपोहन ही होतात.सर्व वेदांकडून मीच जाणण्यास योग्य आहे.तसेच वेदांताचा कर्ताआणि वेदांना जाणणाराही मीच आहे.

द्वाविमौ पुरुषौ लोके, क्षरश्चाक्षर एव च ।

क्षरः(स्) सर्वाणि भूतानि, कूटस्थोऽक्षर उच्यते ॥ 16 ॥

या विश्वात नाशवान आणि अविनाशीही असे दोन प्रकारचे पुरुष आहेत.त्यामध्ये सर्व भूतमात्रांची शरीरे हा नाशवान आणि जीवात्मा अविनाशी म्हटला जातो .

उत्तमः(फ्) पुरुषस्त्वन्यः(फ्), परमात्मेत्युदाहृतः ।

यो लोकत्रयमाविश्य, बिभर्त्यव्यय ईश्वरः ॥ 17 ॥

परंतु या दोन्हींपेक्षा उत्तम पुरुष तर निराळाच आहे .जो तिन्ही लोकांत प्रवेश करून सर्वांचे धारण पोषण करतो .याप्रमाणे तो अविनाशी परमेश्वर आणि परमात्मा असा म्हटला जातो .

यस्मात्क्षरमतीतोऽह- मक्षरादपि चोत्तमः ।

अतोऽस्मि लोके वेदे च, प्रथितः(फ्) पुरुषोत्तमः ॥ 18 ॥

कारण मी नाशवान जडवर्ग-क्षेत्रापासून तर पूर्णपणे पलीकडचा आहे आणि अविनाशी जीवात्म्यापेक्षाही उत्तम आहे .म्हणून लोकांत आणि वेदांत ही पुरुषोत्तम नावाने प्रसिद्ध आहे.

यो मामेवमसम्मूढो, जानाति पुरुषोत्तमम् ।

स सर्वविद्भजति मां(म्), सर्वभावेन भारत ॥ 19 ॥

हे भारता !जो ज्ञानी पुरुष मला अशा प्रकारे तत्वतः पुरुषोत्तम म्हणून जाणतो ,तो सर्वज्ञ पुरुष सर्व रीतीने नेहमी मला वासुदेव परमेश्वरालाच भजतो .

**इति गुह्यतमं(म्) शास्त्र- मिदमुक्तं(म्) मयानघ ।**

**एतद्बुद्ध्वा बुद्धिमान्स्यात्- कृतकृत्यश्च भारत ॥ 20 ॥**

हे निष्पाप अर्जुना !असे हे अति रहस्यमय गुप्त शास्त्र मी तुला सांगितले आहे ,याचे तत्वतः ज्ञान करून घेतल्याने मनुष्य ज्ञान वान आणि कृतार्थ होतो .

**इति श्रीमहाभारते भीष्मपर्वणि श्रीमद्भगवद्गीतापर्वणि**

**श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां(यँ) योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसं(वँ)वादे**

**पुरुषोत्तमयोगो नाम पञ्चदशोऽध्यायः ॥**

**ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते**

**पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥**

**ॐ शांतिः(श्) शांतिः(श्) शांतिः ॥**

वह सच्चिदानंदघन परब्रह्म सभी प्रकार से सदा सर्वदा परिपूर्ण है। यह जगत भी उस परमात्मा से पूर्ण ही है, क्योंकि यह पूर्ण उस पूर्ण पुरुषोत्तम से ही उत्पन्न हुआ है। इस प्रकार परब्रह्म की पूर्णता से जगत पूर्ण होने पर भी वह परब्रह्म परिपूर्ण है। उस पूर्ण में से पूर्ण को निकाल देने पर भी वह पूर्ण ही शेष रहता है।